
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर : एका सांस्कृतिक क्रांतीची सुरुवात

**डॉ. दत्तात्रय नागनाथ बारबोले**
**शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज**



आधुनिक भारताच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसोबत केलेले धर्मांतर ही घटना वंचितांच्या जीवनात क्रातीकारी परिवर्तन घडविणारी ठरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १९५६ सालचे बौध्द धर्मातील धर्मांतर ही एक सांस्कृतिक क्रांती होती. ही क्रांती समजण्यासाठी भारतीय हिंदु समाजशास्त्रे, धर्मशास्त्रे व आधुनिक ज्ञानशाखांच्या आधुनिक सिध्दांताची ओळख असणे ही पूर्व अट आहे. तसेच, ही क्रांती समजून घेण्यासाठी मानवतावादी मूल्यांची ओळख व त्याबरोबरच त्याविषयी आदरभावही असावा लागतो. सनातनी समजल्या जाणाऱ्या भारतीय समाजात या धर्मक्रांतीने मोठे बदल घडवून आणले. या क्रांतीने वर्णवादी व्यवस्थेला नकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या क्रांतीमधून बुध्दीवादी व मानवतावादी समाज निर्माण करावयाचा होता.

डॉ. आंबेडकर यांचे धर्मांतर म्हणजे काय? समजावून घेतले पाहिजे. या ठिकाणी धर्मांतराचा खरा अर्थ म्हणजे विधायक स्वरुपाचा बदल असून जुने सोडून नव्याचा स्वीकार व उच्चतेकडे होणारा विधायक प्रवास होय! याचा सरळ व साधा अर्थ, नवीन जीवन मार्गाचा स्वीकार करणे होय![१]

## धर्मांतराची पार्श्वभूमी :

वर्ण व्यवस्थेवर आधारलेल्या हिंदू धर्मात अस्पृश्यांना या समाजव्यवस्थेने माणूसपणे नाकराले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचा सत्याग्रह (१९२७), काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०), पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह (१९२९), अंबादेवी मंदिर सत्याग्रह, अमरावती (१९२७) या सत्याग्रहांच्या माध्यमातून पारंपरिक हिंदू धर्मावर श्रध्दा असणाऱ्यांना आपल्या आचार-विचार व तत्त्वज्ञानातील विसंगती दूर करण्याची त्यांनी संधी दिली. पण धर्मश्रध्दा रुढी व परंपरांमधील बदल समाज सहजासहज स्वीकारत नाही याची जाणीव झाली. म्हणून त्यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले मुक्कामी धर्मांतराची जाहीरपणे घोषण केली.[२] डॉ. आंबेडकरांच्या मनात बौध्द धर्माने अगदी लहानपणापासूनच जागा केली होती. 'दादासाहेब' कृष्णाजी अर्जुन केळूसकरांनी १९२८ मध्ये प्रसिध्द केलेले मराठी भाषेतील बुध्दाचे चरित्र बाबासाहेबांना ते मॅट्रिक झाल्यानंतर त्यांच्या सत्कार समारंभात भेट म्हणून दिले होते.[३] त्यांचे मन बौध्द धर्माकडे आकृष्ट होत होते. त्यांनी दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक येवले येथे मुंबई इलाखा दलितवर्गीय परिषद भरली होती. या परिषेदत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांनी अशी घोषणा करणारे भाषण केले.[४] या भाषणात त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'हिदू म्हणून घेत मी मरणार नाही.'[५] 'हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर कोणता धर्म स्वीकारायचा हे प्रत्येकाच्या मर्जीवर अवलंबून आहे. समानतेचे हक्क मिळतील असाच धर्म त्यांनी स्वीकारावा',[६] असे आंबेडकरांनी स्पष्ट केले.

## धर्मांतराचे स्वरुप

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केल्यानंतर वेगवेगळया धर्म-पंथाची मंडळी आपला धर्म स्वीकारा म्हणून त्यांच्या कडे येऊ लागली. डॉ. आंबेडकरांनीही विविध धर्म-पंथाचा अभ्यास केला व ते अंतिमतः बौध्द धम्माकड वळले. तथापि, या संदर्भातील निर्णय बाबासाहेबांनी त्वरित जाहीर केला नाही. प्रत्येक धर्माचा अभ्यास करुन त्यांनी तब्बल २१ वर्षांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला.

नागपूरला बौध्द धम्माची व नागवंशियाची ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याने दीक्षा समारंभासाठी हे शहर निवडले. डॉ. आंबेडकरांची दीक्षा देण्यास योग्य असा बौध्द धर्मातील श्रेष्ठतम पंडित आणि सर्वात वर्यावृध्द बुध्द अनुयायी पूज्य भिक्खु चंद्रमणी महास्थवीर यांची निवड

केली.[७] दीक्षेची तारीख १४ ऑक्टोबर १९५६ 'विजयादशमी' ही निश्चित केली. हा समारंभ सकाळी ९.०० ते ११.०० दरम्यान झाला. रविवार, दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब यांनी महास्थवीर भिक्खु चंद्रमणी यांच्या हस्ते बौध्द धर्माची दीक्षा घेतली. या कार्यक्रमास 'अदमासे ५ ते ६ लक्षांपर्यंत जनसमुदाय या कार्यक्रमासाठी उपस्थित झाला होता. त्यापैकी जवळजवळ ३ ते ४ लक्ष लोक बाहेरगावचे होते.'[८] धर्मांतराच्या अगोदरच्या दिवशी दि. १३ ऑक्टोबरला डॉ. आंबेडकरांनी वार्ताहरांना मुलाखत दिली. त्यात ते म्हणतात, 'बौध्द धर्म स्वीकारुन मी हिंदु समाजाच्या दृष्टीने एक उपकारक कृत्यच करत आहे. कारण बौध्द धर्म हा भारतीय संस्कृतीचेच अंग आहे.'[९]

डॉ. आंबेडकरांनी उपस्थित असलेल्या आपल्या हजारो अनुयायांना बौध्द धर्माची दीक्षा दिली. या नवदीक्षित अनुयायांना एक स्वतंत्र आचारसंहिता दिली. ती म्हणजे बावीस प्रतिज्ञा होय! या प्रतिज्ञांचे तीन गट होतात. पहिल्या गटात पूर्वधर्माशी असलेली नाळ तोडताना काय त्याज ठरवायचे यासंबंधीच्या निर्णय, दुसऱ्या गटात नवधर्माचे कोणते संस्कार घ्यावयाचे, तर तिसऱ्या गटात दैनंदिन जीवनातील नवा आचारधर्म!'[१०]

डॉ. बाबासाहेबा आंबेडकर यांनी बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'अखिल भारतीय बौध्द महासभा' या नावाची संस्था १९५० सालानंतर स्थापना केली आहे. ते ६ डिसेंबर १६५६ पर्यंत स्वतः या संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांच्या महापरिनिर्वाणनंतर त्यांचे पुत्र यशवंतराव हे या संस्थेचे अध्यक्षे झाले.[११] भारतीय बौध्द महासभा आजही बौध्द धर्माच्या प्रचार प्रसाराचे काम करत आहे.

## बौध्द धर्माची उपयुक्तता

बौध्द धर्म हा मानवतावादी धम्म आहे. बुध्दाच्या धर्मात माणूस हा केंद्रबिंदु मानला गेला आहे. बौध्द धर्माचा पायाच मूळ नीतीमत्तेवर आधारलेला आहे. ता सदाचारावर आधारित आहे. डॉ. आंबेडकरांनी धर्म व धम्म यातील फरक असा सांगितला आहे. The purpose of religion is to explain the origin of the World. The purpose of Dhamma is to reconstruct the World. धम्म हा धर्माप्रमाणे केवळ या जगाच्या निर्मितीची चर्चा करत बसत नाही. तर धम्म हा धर्माप्रमाणे केवळ या जगाची पुनर्रचना करु इच्छितो. हेच त्याचे प्रयोजन आहे.[१२] 'मला बौध्द धर्म का आवडतो? सध्याच्या जागतिक परिस्थितीत तो किती उपयुक्त आहे' या विषयावर बाबासाहेबांचे भाषण १२ मे १९५६ रोजी 'बीबीसी' वर झाले. त्यात ते म्हणतात, "जगातील इतर धर्म परमेश्वर, आत्मा आणि मुत्युनंतरची मानवाची स्थिती यासंबंधी विचार व उपदेश करतात. पण या तीन गोष्टीविषयी मानवी जीवन सुखमय व्हायला जी तत्त्वे कारणीभूत आहेत ती तत्त्वे बौध्द धर्माने सांगितली व उपदेशिली. ती तत्त्वे म्हणजे प्रज्ञा, करुणा व समता!" मनुष्याने बुध्दिनिष्ठ (अंध चालीरिती व अलौकिक घटना यांना बळी न पडता) राहावे, प्राणिमात्रांवर प्रेम करावे आणि त्यांच्याशी आपुलकीने व समपातळीने वागावे हा या तीन तत्त्वांचा अर्थ! याप्रमाणे सर्व मानव वागू लागले तर जग स्वर्गमय होईल. ही श्रेष्ठतम तत्त्वे बौध्द धर्म शिकवतो म्हणून तो मला आवडतो. हा धर्म जगातील सर्व समाजांना स्थैर्य आणू शकेल. परमेश्वर व आत्मा यांच्यासंबंधीची विचारसरणी या बाबतीत निरुपयोगी आहे अशी माझी श्रध्दा आहे म्हणून मला हा धर्म आवडतो."[१३] दि. १३ मे १९३६ रोजी धर्मांतराचा तात्त्विक दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी मुंबईत एक सभा घेऊन जे भाषण डॉ. आंबेडकरांनी केले ते 'मुक्ती कोण पथे?' या शीर्षकाखाली छापले आहे. शेवटच्या मुद्द्यात त्यांनी भगवान गौतम बुध्दांनी भिक्षु संघास जो धर्मोपदेश केला तो दिला आहे. तो असा, "तुम्ही दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा! परप्रकाशित राहू नका. स्वतःवरच विश्वास ठेवा. दुसऱ्या कोणाच्या अंकित होऊ नका. सत्याला धरुन राहा. सत्याचाच आश्रय करा व दुसऱ्या कोणाला शरण जाऊ नका. मी देखील बुध्दाच्या शब्दाचाच आश्रय करुन तुम्हांला असा निरोप देतो की, तुम्हीच आपले आधार व्हा, स्वतःच्या बुध्दीला शरण जा. दुसऱ्या कोणाचाही उपदेश ऐकू नका. दुसऱ्या कोणाला वश होऊ नका, हा भगवान बुध्दाचा उपदेश तुम्ही या प्रसंगी ध्यानात ठेवाल तर माझी खात्री आहे की, तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही."[१४] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः बौध्द धम्माची दीक्षा घेतली व आपल्या लाखो बांधवांना बौध्द धम्माची दीक्षा दिली. अशा प्रकारे आत्मोन्नतीचा मार्ग त्यांनी आपल्या लाखो बांधवांना दाखवला.

## धर्मांतरची फलश्रुती - सांस्कृतिक क्रांतीची सुरुवात

या धम्मक्रांतीने सर्वच शोषितांच्या आणि शोषकांच्याही संपूर्ण मानवी प्रतिष्ठेचा आशय निर्माण केला स्त्रियांसह आर्थिक आणि सामाजिक विषमतेत जळणाऱ्या सर्वच अन्यायग्रस्त समाज घटक या क्रांतीचे केंद्रबिंदू होते. या क्रांतीचे वैशिष्टय म्हणजे या सर्व समाजघटकांनी या क्रांतीचे नेतृत्त्व स्वीकारले. धम्मक्रांतीच्या स्त्रोतांतून उपेक्षितांना नवसमाज निर्मितीच्या विचारांची ऊर्जा मिळाली. ही ऊर्जा घेऊन आज अनेक सामाजिक चळवळी प्रवाहित झाल्या आहेत. या क्रांतीद्वारे नवसमाज रचना करण्याची प्रक्रिया आजही निरंतर चालू आहे.

ज्या समाज घटकांनी धम्माचा स्वीकार केला त्यांच्यामध्ये मोठे सांस्कृतिक बदल झाले आहेत. बौध्द धम्म स्वीकारल्यानंतर त्यांनी जुन्या चालीरितींचा त्याग केला, विज्ञानवादी दृष्टिकोनाचा अंगिकार केला. विचार करण्याच्या पध्दतीत मोठे बदल झाले. बौध्द पध्दतीने जन्मापासून मरणापर्यंतचे संस्कार केले जाऊ लागले. सण-समारंभमध्ये बदल झाले. बुध्दपौर्णिमा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठया प्रमाणात साजरी केली जाऊ लागली. दीक्षाभूमी, चैत्यभूमी ही मानवतेची मंदिरे निर्माण झाली. मुलांचे नाव ठेवण्यासाठी व घरांच्या नावांसाठी प्राचीन बौध्द संस्कृतीतील नावांचा वापर मोठया प्रमाणात होऊ लागला. दलित भाषांमध्ये त्याची निर्मिती झाली. कला साहित्यांमध्ये मानवतावादी मूल्यांचा उद्‌घोष होऊ लागल्या. इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला. स्थापत्याशाखात बौध्द संस्कृतीचे तत्त्वे

आत्मसात केली होती. सर्वात महत्त्वाची म्हणजे भारतातून सम्राट अशोकानंतर धम्मचक्रप्रर्वतन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बोधिसत्त्व ठरले.

- **संदर्भ**


१) संपा. गवळी, टी. ए. व इतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक नंदिनी गवळी, सागर माळ, कोल्हापूर १९९१, पृ. ६०५.
२) संपा. गवळी, टी. ए. व इतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक नंदिनी गवळी, सागर माळ, कोल्हापूर १९९१, पृ. ५७० व ५५१.
३) मून, वसंत (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास, मनोविकास प्रकाशन मुंबई, १९८९, पृ. ३३.
४) मून, वसंत (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास, पृ. २
५) मून, वसंत (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास, मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. ३३.
६) आंबेडकर, बाबासाहेब लेखन आणि भाषणे, भाग - १ (१९२० ते १९३६), महाराष्ट्र शासन प्रकाशन, २००२, पृ. ४३२.
७) खैरमोडे, चां. भ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खंड १२, सुगावा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पुणे, २०००, पृ. ४३२.
८) उपरोक्त पृ. ५४
९) उपरोक्त पृ. ५१.
१०) २ संपा. गवळी, टी. ए. व इतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक नंदिनी गवळी, सागर माळ, कोल्हापूर १९९१, पृ. ५७८.
११) शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. १४७.
१२) कसबे रावसाहेब, डॉ. बाबासाहेब आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पाचवी आवृत्ती, पुणे, २०१४, पृ. ६०.
१३) खैरमोडे, चां. भ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खंड १२, सुगावा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पुणे, २०००, पृ. २९, ३०.
१४) मून, वसंत (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास, पृ. ९७. (दिनांक : १९ डिसेंबर, २०१६, कोल्हापूर)